छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर

" भोगवटा प्रमाणपत्र "

OCCUPANCY CERTIFICATE

जा.क्र./मनपा/नरवि/भो.प्र. क्र./ 124 /17/2024-25
कार्यालय महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर
दिनांक :- 08 / 08 / 2024

भोगवटा प्रमाणपत्र धारण करणा-याचे नाव :- **श्री. सुरेश नारायणराव तारगे तर्फे जी.पी.ए. धारक**
मे. आदेश्वर कन्स्ट्रक्शन तर्फे भागीदार
श्री. गौतम मांगीलाल कटारीया व
श्री. पवनकुमार सुगनचंद मुगदिया
भू.क्र.:- 07, न.भू.क्र./सर्व्हे क्र./गट क्र.:- **15731,**
मोहल्ला:- श्रीराम नगर, गारखेडा, छत्रपती संभाजीनगर.

प्रमाणित करण्यात येते की, **भू.क्र.:- 07, न.भू.क्र.**/सर्व्हे क्र./गट क्र.:- **15731, मोहल्ला:- श्रीराम नगर, गारखेडा, छत्रपती संभाजीनगर** या मिळकतीवर भागश:/**संपुर्ण**/**B. F., G. F., Mezzanine Floor + 6 Floor Only** साठी बांधकाम परवानगी संचिका क्रमांक **19/17/2022-23** बांधकाम परवानगी क्रमांक **34/2022-23 दि. 04 /05 / 2022** नुसार परवानाधारक **वास्तुविशारद**/इंजिनियर/सुपरवायझर श्रीमती./**श्री. सज्जाद ए. के. लोधी** यांना परवाना क्र. **CA/2005/37094** यांच्या देखरेखीत सदर इमारतीचे बांधकाम झालेले असुन त्यांनी सादर केलेल्या पुर्णत्व प्रमाणपत्राच्या आधारे सदर बांधकाम झालेल्या इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र खालील प्रमाणे/अटीवर देण्यात येत आहे.

1) सदरील भूखंडाचे हद्दीत चतु:सिमा बाबत वाद उत्पन्न झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबादारी मिळकतधारक/विकासक आणि अर्जदार तथा **वास्तुविशारद**/इंजिनियर/सुपरवायझर यांची राहील.
2) सदर भोगवटा प्रमाणपत्र इमारतीचे मर्यादेपर्यंतचे आहे. इमारतीचे स्थानांकन, भूखंडाचे क्षेत्र, हद्दी, चतु:सिमा इत्यादी बाबत वाद निर्माण झाल्यास तसेच विकास योजनेनुसार भुखंडाचे स्थानाबाबत भविष्यात वाद निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदारावर राहील. त्या करिता महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.
3) सदरच्या भोगवटा प्रमाणपत्र व्यतिरिक्त भविष्यात प्रत्यक्ष जागेवर अतिरिक्त बांधकाम आढळल्यास ते अनाधिकृत विनापरवानगी समजुन त्यावर नियमानुसार कारवाई करण्यात येईल.
4) बांधकाम परवानगी मध्ये नमुद केलेल्या अटी / शर्ती अर्जदारास बंधनकारक राहील.
5) विकासकावर विकसीत इमारतीचे बाबत इतर कायद्यानुसार असलेल्या तरतुदी प्रमाणे सर्व बाबींची पुर्तता करण्याची जबाबदारी राहील.
6) छतावर पडणा-या पावसाचे पाणी संकलीत करुन विधंन विहीर/शेषकुप मध्ये पुर्नभरण करावे. त्याची कायम स्वरुपी देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी अर्जदारावर राहील.
7) सोबतच्या नकाशाप्रमाणे **B. F., G. F., Mezzanine Floor + 6 Floor Only** साठी एकुण बांधकाम क्षेत्र **1765.67** चौ.मी. करीता भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले असुन चटई क्षेत्र निर्देशांक **(F.S.I.) 3.65** वापरला आहे.
8) भोगवटा प्रमाणपत्रासाठी जादा बांधकाम दंड/शहर विकास निधी रक्कम रु. **2,07,800/-** चलन क्र. **1034** दिनांक **31/07 /2024** रोजी जमा केले आहे.
9) प्रिमीयम **(Ancilarry)** रक्कम रु. **61,800** /- चलन क्र. **1035** दिनांक **31/07/2024** रोजी जमा केले आहे.
मंजुरी दि. :- **29 / 07 /2024**

प्रशासक
महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर
यांचे करिता

प्रत :- सहाय्यक आयुक्त **VII (TP- 2)** महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर यांना पुढील कार्यवाहीस्तव.

O.C. Signed By D.D.T.P.